**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

**जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे.**

**जाहिरात क्रमांक/ब/मह.शाखा/कक्ष/१/आस्था/३/कावि/पदभरती/२२९/२०१४ दि.१७/०५/२०१४**

शासन निर्णय क्र.पदभरती/२०१३/प्र.क्र.४७/ई-१० दि. २६/०२/२०१४ अन्वये महसूल विभागातील गट **क** व गट **ड** च्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त असलेल्या पदावर भरती करण्यासाठी असलेले ३ टक्के पदे भरण्याच्या अटीतून सुट दिलेली आहे. अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-२०१३/ प्र.क्र.१४७/ई-१० दि. २९/०४/२०१४ अन्वये लिपीक व वाहनचालक **पदासाठी दिनांक- ०८/०६/२०१४ व तलाठी पदासाठी दि.२२/०६/२०१४ रोजी** परीक्षा घेणेबाबत कळविलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्र.प्रा.नि.म/ २००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ. दि.१९/१०/२००७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश आहेत. सदर शासन निर्णयात जिल्हास्तरीय समिती मार्फत भरती कामी नविन कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार धुळे जिल्हाधिकारी कार्यालयांतील येथील गट **क** मधील **लिपीक-टंकलेखक, तलाठी व वाहनचालक संवर्गातील सद्यस्थितीत रिक्त असलेली पदे सरळ सेवेने भरावयाची आहे त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन सदर जाहिरातीव्दारे दि - १९/०५/२०१४ ते दिनांक - २९/०५/२०१४ रोजी सायंकाळी ६-०० वाजेपर्यत फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवारांना ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्याबाबत ऑनलाईन अर्जात स्पष्ट नमूद करावे.**

**पदनाम: लिपीक-टंकलेखक : १० पदे.**

**वेतनश्रेणी :- रु ५२००-२०२०० ( ग्रेड वेतन - १९०० )**

| अ.नं. | प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ३% | भुंकप ग्रस्त २% | अपंग ३% | खेळाडु ५% | |
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | ५ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ३ | भज ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भज क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भज ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | इमाव | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ७ | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | **१०** | **३** | **१** | **०** | **०** | ० | ० | ० | **६** |

टिप - सदर पदांचे समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

**पदनाम :- तलाठी : १७ पदे.**

**वेतनश्रेणी :- रु. ५२०० - २०२०० (ग्रेड वेतन- २४००)**

| अ.नं. | प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ३% | भुंकप ग्रस्त २% | अपंग ३% | खेळाडु ५% | |
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | अनु.जमाती | ६ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| ३ | भज ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | भज क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भज ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | इमाव | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ७ | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | खुला | ६ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ |
| | **एकूण** | **१७** | **५** | **२** | **१** | **०** | ० | ० | ० | **९** |

टिप - सदर पदांचे समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

**पदनामः वाहनचालक : ०१ पदे**

**वेतनश्रेणी :- रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन - १९००)**

| अ.नं. | प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ३% | भुंकप ग्रस्त २% | अपंग ३% | खेळाडु ५% | |
| १ | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अनु.जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | भज ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भज क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भज ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | वि.जा.अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ६ | इमाव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | ० | ० | ० | **१** |

टिप - सदर पदांचे समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

**टिप** १ :- १) अतिरिक्त संवर्ग, आंतर विभागीय बदली, अनुकंपा व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी जास्त होणे) व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. परीक्षेची पध्दत, परीक्षा स्थगीत करणे वा रद्द करणे, किंवा परीक्षेच्या प्रक्रियेत अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी धुळे हे स्वत:कडे राखुन ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकाराचा दावा सांगता येणार नाही. समांतर आरक्षणानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे त्या संवर्गातुन भरली जातील.

२) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविणेत आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या सामाजीक प्रवर्गातील एकुण पदांपैकी आहे.

**टिप २** :- शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील अ.शा.पत्र दि.१८ जानेवारी २०१२ अन्वये व महसुल व वन विभागाकडील दि.१०/२/२०११ च्या शासन

निर्णयातील परीशिष्ट अ मध्ये नमुद केलेप्रमाणे अपंग उमेदवाराच्या संदर्भात (१) अंध किंवा क्षीणदृष्टी - B/LV,(२) श्रवण शक्तीतील दोष - HH (३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - OA/OL/BL/OAL

**शैक्षणिक अर्हता -** :-

| अ.क्र. | पदनाम | अर्हता |
|---|---|---|
| १ | लिपीक टंकलेखक | १. एस.एस.सी(शालांत प्रमाणपत्र परीक्षा) उत्तीर्ण.<br>२. शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र-टंकलेखन मराठी ३० शब्द प्रती मिनिट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रती मिनिट मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>३. D.O.E.A.C.C.सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याची प्रमाणपत्रे किंवा ब) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| २ | तलाठी | संविधानिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य केलेली अन्य अर्हता धारण करणे आवश्यक आहे. |
| ३ | वाहनचालक | १. इयत्ता ४ थी उत्तीर्ण.<br>२. मोटार वाहन अधिनियमातील तरतूदीनुसार जड वाहन किंवा मोटारकार किंवा जीप चालविण्याचा व अस्तित्वात असलेला परवाना असणे आवश्यक.<br>३. स्वयंचलित दुचाकी व्यतिरिक्त अन्य स्वयंचलित वाहने चालविण्याचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४. मोटार कार किंवा जीप यांच्या दुरस्तीचे ज्ञान असणे आवश्यक.<br>५. सुदृढ प्रकृतिमान आणि संबंधीत क्षेत्रातील भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान आवश्यक. |

**वयोमर्यादा ( सर्व पदांसाठी )** :

१. **उमेदवारांची वयोमर्यादा दि.१३/०५/२०१४ रोजी गणली जाईल.**

२) उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाची शिथिलता)

**टिप ३ :-** १) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या आणि महाराष्ट्राचा रहिवासी असलेल्या अ.जा., अनुसूचित जातीतील बौध्द धर्मांतरीत,अ.ज,वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र आणि इमाव उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथील केली जाईल. परंतु उन्नत व प्रगत गटांमध्ये (Creamy Layer) मोडणा-या वि.जा.(अ),भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड), विमाप्र आणि इमाव उमेदवारांना ही सवलत लागू नाही.

२ ) खेळाडुची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदांसाठी असलेली वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथील केली जाईल.

३) शासन निर्णय २७/१०/२००९ नुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनंअंतर्गत तीन वर्ष काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शक केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या अंशकालीन पदवीधर उमेवारांना वय ४६ वर्ष पर्यंत शिथिल.

४) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही त्यांनी सशस्त्र सेनेमध्ये केलेली सेवा अधिक ३ वर्ष आणि सेवेमध्ये कार्यरत असतांना अपंगत्व आल्यास कमाल ४५ वर्ष असेल. (दि. २०/८/२०१०)

५) प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांना वय ४५ वर्षापर्यंत शिथील (दि.३/२/२००७)

६) अपंगांकरिता वय ४५ वर्षापर्यंत शिथील. (शा.नि.२६/०६/२००१)

७) स्वातंत्र्य सैनिकाचे नाम निर्देशित पाल्य, जनगणना कर्मचारी, निवडणूक कर्मचारी इ. विविध घटकांना वयोमर्यादेत ४५ वर्षापर्यंत सुट देण्यात आलेली आहे. तसेच प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त / स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन-१९९१ चे जनगणना कर्मचारी, सन-१९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदवीकाधारक, अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ०६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. (दिनांक ०६/१०/२०१०).

८) तलाठी पदावर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम ६ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदरचा कालावधीमध्ये ते परिविक्षाधीन कर्मचारी म्हणून गणले जातील व सदरचे प्रशिक्षण पुर्ण झालेनंतरच त्यांना तलाठी पदावर नियमीत पदस्थापना संबंधीत उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत देण्यात येईल.

**सदर पदासाठी लागु असलेल्या सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

**१. आरक्षणाखालील नियुक्त्या :**

१) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) या प्रवर्गासाठी निश्चीत केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल. उक्त आरक्षणाची पदे त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास वरीलपैकी त्या प्रवर्गातील योग्य उमेदवारांना नियुक्ती देण्यात येऊन पदे भरण्यात येतील.[महाराष्ट्र राज्य लोकसेवा आरक्षण अधिनियम २००१. दि.२९ जानेवारी २००४, पासुन लागू कलम ४ (३)]

२) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन प्रशासन विभाग निर्णय क्रमाक बीसीसी २०११ / प्र.क्र.१०६४/२०११/१६ ब. दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात म.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी आदेशाच्या अधिन राहुन तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन ६ महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षीप्रभावाने रद्द करण्यात येईल.

३) लिपिक-टंकलेखक व तलाठी या पदाचे समांतर आरक्षणाखालील पदांसाठी आवश्यक अर्हता धारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या प्रवर्गातील अन्य उमेदवारांमधुन सदरचे पद भरण्यात येईल.

**२.नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र :-**

१. आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ४ पोटकलम २ च्या परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे(क्रिमीलेअरचे) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसूचित जाती (विमुक्त जाती-अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) त्याचबरोबर इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गांना लागू करण्यांत आलेले आहे. त्यानुसार उपरोक्त आरक्षणाखाली अर्ज करतांना संबंधितांनी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे दि.३१/०३/२०१५ पर्यंतचे विहीत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
२. शासनाचे महिला व बाल विकास विभागाकडील निर्णय क्रमांक ८२/२००१/ मसेआ/२०० प्र.क्र.४१५/का-२ दि.२५/५/२००१ अन्वये खुला, इमाव, विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती (ब),भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्गातील महिला उमेंदवारांना राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी दिनांक- ३१/३/२०१५ या दिनांकापर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
३. तसेच खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू/महिला सदस्यांना खेळाडु/महिला आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. उक्त आरक्षणाखाली अर्ज करतांना क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे विहीत प्रमाणपत्र तपासणीच्या वेळेस हजर करणे आवश्यक राहील.

**३. समांतर आरक्षणातंर्गत असलेल्या पदांसाठी अटी व शर्ती:-**

**अ) अंशकालीन उमेदवारासाठी :-**

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

**ब) माजी सैनिक उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित/साक्षांकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झाल्या शिवाय त्यांना नियुक्ती आदेश देणेत येणार नाही.

**क) महिलांसाठी असलेले आरक्षण :-**

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का-२ दिनांक २५ मे २००१ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०१३ - २०१४ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दि.३१/३/२०१५ पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमिलेयर) प्रमाणपत्र **तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**ड) अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारासाठी :-**

अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रंमाक रक्रिधो-२००२/प्रक्र ६८/क्रियूसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतूदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे सदर शासन निर्णयासोबतच परिशिष्ट अ मध्ये नमूद खेळामध्ये राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावर प्रविण्य मिळविल्याचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे. लेखी परीक्षेत निवड झालेल्या खेळाडू उमेदवारांचे खेळाबाबतचे प्रमाणपत्र हे क्रिडा संचालनालय पुणे यांचे कार्यालयातून पडताळणी करुन वैध असलेचे प्रमाणपत्र असल्याशिवाय खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश दिला जाणार नाही.

**४. संगणक अर्हता :**

म.ना.से. ( संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत ) **नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणुन खालील अ किंवा ब प्रमाणे प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी** सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल. (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर **किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याची** प्रमाणपत्रे किंवा ( ब ) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५** व शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि.२८ मार्च २००५ अन्वये (विवाहीत / अविवाहीत) उमेदवारांना लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्राच्या नमुना-अ मध्ये प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. **त्यामुळे अविवाहीत उमेदवारांनीही निरंक प्रमाणपत्र लिहून देणे आवश्यक आहे.** उमेदवाराने अर्जासोबत पदासाठी आवश्यक असलेली शालांत परीक्षा अथवा पदवीधर परीक्षा

उत्तीर्ण असल्याच्या गुणपत्रकाची छायांकित प्रत स्वतःच्या स्वाक्षरीने साक्षांकित (Self Attested) करुन जोडावी.

६. **खेळाडुंसाठी अर्हता** : अत्युच्च गुणवताधारक खेळाडूसांठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२. दि.३०/४/२००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुला प्रवर्गातील अत्युच्च गुणवताधारक खेळाडुसांठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेंदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडु प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( शासन निर्णय परीशिष्ट अ मधील नमुद ) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे खुला प्रवर्गातील खेळाडुंना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दि.३१/३/२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

७. **परीक्षा शुल्क - खुला प्रवर्ग रु. ४००/-** **मागास प्रवर्ग रु. २००/-**

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे. माजी सैनीकांना परीक्षा शुल्क माफ आहे. यासाठी बँकेची वेळ पाळणे उमेदवाराची जबाबदारी राहील.

**टिप**- वरील शुल्क हे जिल्हा निवड समितीसाठी आहे. या शिवाय शुल्क जिल्हा निवड समितीच्या नावाने जमा करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडीया कडुन रु.६०/- इतक प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

८. **सर्व साधारण शर्ती -**

१. मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२. उमेदवार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

३. शासन निर्णय क्रमांक अनियो-१०५/१२६/सेवा-४/दिनांक ३१/१०/२००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ०१/११/२००५ नंतर नियुक्तीसाठी पात्र ठरणा-या कर्मचा-यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागु राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्त वेतन योजना ( म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची सांक्षाकित छायांकीत प्रत जोडावी.

५. न्याय प्रविष्ट प्रकरण,फौजदारी,शिस्तभंगविषयक,वा तस्सम इत्यांदी कार्यवाही संबंधिची माहिती अर्जातील संबंधित परिच्छेदात नमुद करावी.नमुद केलेल्या माहितीमध्ये अर्ज सादर केल्यापासुन निवड प्रक्रिया संपेपर्यतच्या काळात घडणारे बदल उमेदवारांने कळविणे आवश्यक राहील. ही माहिती न दिल्यास तसेच त्यात नंतर घडुन आलेले बदल उमेदवाराने न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यानंतर रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

९. **निवडीसाठीची कार्यपध्दती : (परीक्षेचे स्वरुप).**

| अ. क्र. | पदाचे नांव | लेखी परीक्षेचा दिनांक | परीक्षेचा स्वरुप | परीक्षेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक टंकलेखक | ०८/०६/२०१४ | २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा लेखी परीक्षेत मराठी, इंग्रजी, सामान्य | माध्यमिक शालांत परीक्षेच्या समान दर्जा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ज्ञान व अंकगणित या विषयाकरीता प्रत्येकी ५० गुण राहतील | |
| २ | तलाठी | २२/०६/२०१४ | २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा लेखी परीक्षेत मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयाकरीता प्रत्येकी ५० गुण राहतील | परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. |
| ३ | वाहनचालक | ०८/०६/२०१४ | लेखी परीक्षा - ५० गुण.<br>व्यावसायिक चाचणी - ४० गुण.<br>मुलाखत - १० गुण.<br>एकुण - १०० गुण.<br>(टिप - लेखी परीक्षेमध्ये गुणवत्तेनुसार व रिक्त जागेंच्या प्रमाणानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच फक्त व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी बोलविले जाईल). | जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान, सामान्य ज्ञान या विषयांशी निगडीत. |

**१०. अर्ज कसा करावा :**

१) प्रस्तुत पदाकरिता फक्त अधिकृत संकेत स्थळावरुन विहीत पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्‌ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज WWW.dhule.nic.in या वेबसाईटव्दारे दिनांक- १९/०५/२०१४ ते दिनांक- २९/०५/२०१४ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना WWW.dhule.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या बँकेत फी भरल्याचे चलनाव्दारे ३ प्रतिमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढुन त्या चलनामार्फतच दिनांक - ३१/०५/२०१४ पावेतो उमेदवाराने फी स्टेट बँक ऑफ इंडीया च्या कोणत्याही शाखेत भरणे आवश्यक राहील. सदरच्या तीन प्रतिपैकी उमेदवारास त्याची स्वताची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेकडुन परत मिळेल. त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत अशा उमेदवाराने कागदपत्रांच्या छाननीच्या वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी केली जाणार नाही. तसेच चलनाची मुळ प्रत परीक्षेच्या दिवशी सोबत आणावी.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा चालू ई-मेल आय डी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी व्दारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:चा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनूसार विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची साईज ४० के.बी. पेक्षा कमी असणे

आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे आवश्यक आहे.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशील www.dhule.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षेच्या ८ दिवसाअगोदर www.dhule.nic.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. प्रवेशपत्रावर उमेदवाराने त्याचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्रावर राजपत्रित अधिका-याचे साक्षांकन करुन परिक्षेस आणणे आवश्यक आहे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.

## पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती :-

१) वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

२) उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. नियुक्तीपूर्वी, मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला, तसेच आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकित प्रमाणपत्रे (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर / प्राचार्य व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे) इ. ची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल.

३) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडेस असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दि. २७ जून २०११ नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

४) सदर पदांसाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

५) गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्रांची तपासणी करणेकरीता बोलाविण्यात येईल. उमेदवारांना कागदपत्रे तपासणीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

६) उक्त पदांसाठी छाननी न करता जाहिरातीनुसार परिपुर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा संकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशील www.dhule.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र www.dhule.nic.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

७) लेखी परीक्षेसाठी व कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

८) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, धुळे या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

९) विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

१०) नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारांना मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशास अधिन राहून धुळे जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १ महिन्याचे आत रूजू होणे आवश्यक राहील.

११) शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६६-ब दिनांक १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१२) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमूक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानूसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विमाप्र व इमाव यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे ३१ मार्च २०१५ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलीअरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

१३) उक्त नमूद पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबातचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक १/७/२००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक१९ मार्च २००३ नुसार गट क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्ती पूर्वी शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

१५) शासन वित्त विभाग निर्णय क्रं अनियो /१०/०५/१२६/सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि. ०१ नोंव्हेबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन)नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१७) उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

१८) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे उमेदवारांनी समजू नये.

१९) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना व भरतीची जाहिरात www.dhule.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**परीक्षेचे स्वरुप :-**

- लेखी परीक्षेमध्ये पात्र उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
- वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
- लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेले गुण www.dhule.nic.in या संकेस्थळावर पाहता येतील, या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.
- परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २७ जून २००८ मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.
- वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्रांच्या पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनानुसार त्यांच्या कागदपत्रांच्या छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्रांच्या छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्यांचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही.
- निवड झालेले उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच पोलीसांकडील चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्रही सादर करावे लागेल.

| अ. | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक - १९/०५/२०१४ ते दिनांक - २९/०५/२०१४. (सायंकाळी ६-०० वाजे पर्यंत) |
| २ | बँकेत विहित चलनाद्धारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक- ३१/०५/२०१४ (बँकेच्या कार्यवेळेत) |
| ३ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | परीक्षेचे ४ दिवस अगोदर |

**विशेष सूचनाः-**

- लहान कुटूंबाचे नमुना **अ** चे प्रतिज्ञापत्र भरणे आवश्यक आहे.
- या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.

- विहीत पध्दतीने अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी धुळे यांनी स्वत:कडे राखून ठेवला असून याबाबत उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.
- पदभरती प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची वा खोटी आढळून आल्यास, सदर उमेदवार दंडात्मक कारवाईसाठी तसेच त्याआधारे नियुक्ती झाल्यास सेवेतून काढण्यास पात्र राहील.
- अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
- नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणास्तव विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तसेच जाहिरातीत नमूद दिनांकात काही बदल झालेस परिस्थितीनुरुप सोयीनुसार पुढील दिनांक निश्चित करुन वर्तमानपत्रामधुन व जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.
- प्रस्तुत परिक्षेच्या अनुषगांने वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना, निकाल व अनुषंगीक माहिती जिल्हाधिकारी धुळे यांचे संकेतस्थळ www.dhule.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. व्यक्तीगत सूचना, माहिती दिली जाणार नाही.
- अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी ०२५६२-२८८७११/१२ या दुरध्वनीवर तसेच भ्रमणध्वनी क्रमांक ८७९३०८३७१२ व ८७९३०८३७१३ यावर संपर्क साधावा.

स्थळ – धुळे
**दिनांक :- १७/०५/२०१४**

सदस्य सचिव,

स्वाक्षरी/-
अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा,
जिल्हाधिकारी धुळे.